# महासचिवांचा अहवाल
# 1 एप्रिल 2023 ते 31 मार्च 2024

प्रिय बंधु भगिनींनो सन 2023-24 या वार्षिक अहवाल आपल्या हाती देताना खऱ्या अर्थाने आनंद होत आहे. कारण आपण दिलेल्या योगदानामुळेच संस्थेने संबंध वर्षभरात 154 उपक्रम राबविले.

मित्रांनो गेल्या अनेक वर्षापासून आपल्या संस्थेसाठी स्वतंत्र जागा घेण्याचे स्वप्न उराशी बाळगून होतो. कारण आपल्या मालकीची स्वतंत्र जागा असेल तरच आपण मनासारखे उपक्रम राबवू शकतो. परंतु स्वतःची जागा असणे ही माझ्यासाठी अथवा संस्थेसाठी अवघड गोष्ट होती. परंतु खऱ्या अर्थाने सन 2023-24 हे वर्ष स्वप्नपूर्तीचे वर्ष आहे असे म्हणावे लागेल कारण होय यावर्षी संस्थेने त्रंबक रोड येथे अंजणेरी शिवारात दीड एकर जागा खरेदी केली असून तेथे स्थिर व कायमस्वरूपी उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

माझ्या मनात तेथे एक कार्यशाळा तसेच कौशल्य विकास केंद्र व इंग्रजी माध्यम शाळा सुरू करावी अशी इच्छा आहे आणि मला खात्री आहे अगदी लवकरच हे स्वप्न तुम्हा सर्वांच्या सहकार्याने साकार होणार आहे हे व्यक्त करताना मला खूपच आनंद होतो. संस्थेने वर्षभरात राबविलेल्या उपक्रमांचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

1. **ज्ञानेश्वरी पारायण:** अंध व्यक्तींना अध्यात्माची गोडी लागावी व तत्कालीन मराठी भाषा अंध व्यक्तींना समजावी जेणेकरून आपल्या मराठी भाषेत असलेला अनमोल ठेवा त्यांना वाचता येईल या उद्देशाने पाच ते सात मे 2023 या कालावधीत देवाची आळंदी येथे आळंदी संस्थानच्या संयुक्त विद्यमाने दृष्टीहीन व्यक्तींकरिता तीन दिवसीय ज्ञानेश्वरी पारायण आयोजित करण्यात आले होते. या पारायणात 9, 12, 15, 16, 18 या अध्यायांचे वाचन करण्यात आले. त्याकरिता ह.भ. प श्री गणपत महाराज जगताप यांनी सहकार्य केले. ते दृष्टिहीन असताना देखील त्यांची ज्ञानेश्वरी मुखगत असल्याचे जाणवले व दृष्टिहीन बांधवांना याचा अभिमान असायला हवा. या तीन दिवसीय पारायणात महाराष्ट्रातून साधारण 54 व्यक्तींनी सहभाग घेतला होता. प्रत्येक व्यक्तीला ज्ञानेश्वरी ग्रंथ व भावार्थ हरिपाठ निशुल्क देण्यात आला. तीन दिवस पारायणाव्यतिरिक्त सायंकाळी कीर्तनाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे उद्घाटन 5 मे 2023 रोजी ह. भ. प नारायण महाराज व अन्य मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले तर समारोप 7 तारखेला आळंदी संस्थाच्या विश्वस्त योगेश देसाई, संजय भारगावे, डॉ. प्रशांत सुरू व डॉ. शालिग्राम भंडारी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. यावेळी योगेश देसाई यांनी आपले मनोगत व्यक्त करताना हा आगळावेगळा उपक्रम करण्याकरीता BWOI संस्थेने संधी दिली त्याबद्दल समाधान व्यक्त केले. कारण दृष्टिहीन व्यक्ति ज्ञानेश्वरी चे पारायण करतात ही समाजाला देखील समजले व भविष्यात ज्ञानेश्वरी चे आणखी काही अध्याय पूर्ण करण्याकरिता प्रयत्न करू अशी ग्वाही दिली व व्यक्तिश: रु.१,००, ०००/- रक्कम देण्याचे त्यांनी जाहीर ही केले. तर डॉ सुरू यांनी देखील उपक्रमांची प्रशंसा करून सदरचा उपक्रम नियमित राबवावा अशी अपेक्षा व्यक्त केली व दत्तक पालक शिष्यवृत्ती योजणेकरिता एक विद्यार्थ्याची रक्कम देण्याचे आश्वासन दिले.

डॉ. शालिग्राम भंडारी यांनी देखील आपले मनोगत व्यक्त करताना ज्ञानेश्वरी चे वाचन दृष्टिहीनांनि केल्याने संस्थेने उद्देश ठेऊन आयोजित केलेल्या उपक्रम खऱ्या अर्थाने यशस्वी झाल्याचे समाधान व्यक्त केले. व लायन्स क्लब दुर्लक्षित घटकांना नेहमीच सहकार्य करेल याची ग्वाही दिली.




श्री. संजय भारगावे यांनीही अशा पध्दतीचे उपक्रम सातत्याने राबवल्यास दृष्टिहीनांच्या ज्ञानात भर पडेल. याच कार्यक्रमात डॉ. विजय विश्वनाथ हटकर यांच्या वतीने त्यांच्या मातोश्री कैलासवासी शोभा हटकर यांच्या स्मरणार्थ ब्रेल लिपीतील सार्थ हरीपाठाचे पुस्तक दृष्टिहीन बांधवांना निशु:ल्क देण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता संस्थांचे व्यवस्थापक श्री ज्ञानेश्वर वीर, अध्यक्ष अरुण भारस्कर, महासचिव दत्ता पाटील व रेचल शिरसाठ यांनी विशेष परिश्रम घेतले.

2. <u>**शिष्यवृत्ती वितरण सोहळा:**</u> संस्थेच्या वतीने शिक्षण घेणाऱ्या गरजूदृष्टीहीन व्यक्तींकरिता प्रोत्साहन मिळावे म्हणून मागील पंधरा वर्षापासून शिष्यवृत्ती देण्यात येते. यावर्षी 2022-23 या शैक्षणिक वर्षात शिकणाऱ्या 135 विद्यार्थ्यांना प्रति विद्यार्थी 1800/- रुपये प्रमाणे चे धनादेश देण्यात आले. यावर्षी विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन १८ जून 2023 रोजी ठाण्यात व २४ जून 2023 रोजी पुण्यातील पत्रकार भवन येथे आयोजित करण्यात आला होता.

   खरे तर 1800 रुपये ही फार मोठी रक्कम नाही परंतु, या रकमेचा उपयोग त्यांचा प्रवेश घेण्याकरिता अथवा एस. टी पासकरीता होऊ शकतो अशी संस्थेची धारणा आहे. शासनाचे कोणतेही अनुदान नसताना देखील हा उपक्रम सातत्याने संस्थेच्या वतीने मागील 18 वर्षापासून अखंडितपणे सुरू आहे ही अभिमानाने सांगावेसे वाटते. ठाणे येथे झालेल्या कार्यक्रमास सौदामिनी क्लब च्या अध्यक्षा सुप्रिया साहू, रोटरी क्लब ठाणे स्कायलाइन चे प्रदीप जैन व उद्योजक नांणजीभाई ठक्कर उपस्थित होते. तर 24 जून 2023 रोजी पुणे येथील कार्यक्रमास उद्योजक कृष्णकुमार गोयल, काका हलवाई चे राज सेठ गावडे व डॉ. शालिग्राम भंडारी हे मान्यवर उपस्थित होते.



   श्री. गोयल यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले असेच उच्चशिक्षित व्हा व संस्थेने असेच स्तुत्य उपक्रम राबवावेत असे सांगितले व समाज आपल्या सोबत आहे व संस्थे द्वारा घेण्यात येणाऱ्या जागेची स्टॅंप ड्यूटी ची रक्कम देण्याचे आश्वासित केले. तर अनुदान नसताना ही संस्थेच्या वतीने हा उपक्रम नियमित राबविन्यात येत असल्याचे समाधान डॉ. भंडारी यांनी व्यक्त केले. तर श्री गावडे यांनी देखील भविष्यात संस्थेस जमेल ते सहकार्य करू अशी ग्वाही दिली व विद्यार्थी अंध असताना ही चांगले गुण मिळवतात थक्क झाल्याची भावना व्यक्त केली. कार्यक्रमाच्या यशस्वीते करीता अध्यक्ष अरुण भारस्कर, कोषाध्यक्ष विजया मराठे व संचालक भगवान पवार यांनी विशेष मेहनत घेतली.

3. **<u>आषाढी एकादशी निमित्त पंढरीचे सुख नाही त्रिभुवनी:</u>** द ब्लाइंड वेल्फेअर ऑर्गनाईझेशन व लायन्स क्लब कॉर्पोरेट यांच्या विषेश सौजन्याने आषाढी एकादशीचे औचित्य साधत गुरुवार दि. 29 जुन 2023 रोजी स्वरांगण प्रस्तुत "पंढरीचे सुख नाही त्रिभुवनी" हा कार्यक्रम परशुराम सायखेडकर नाट्यगृहात पार पडला.



या कार्यक्रमात सौ. विद्या ओक, दत्तात्रय माने, जितेंद्र देवरे, विलास पाटील व भगवान पवार या कलावंतांनी आपला सहभाग नोंदविला. एकापेक्षा एक सरस अभंग सादर करून मैफिलीची रंगत वाढविली. तर श्रीमती रागिणी कुलकर्णी यांनी देखील आपल्या रसाळ निवेदनातून कार्यक्रमाची ऊंची वाढविली व रसिकांनी देखील भरभरून दाद दिली. खरे तर अंध कलावंतांमध्ये चांगल्या क्षमताही असतात परंतु त्यांना एक हक्काचे व्यासपीठ मिळवून द्यावे जेणेकरून समाजाला त्यांच्या क्षमता समजल्यास त्यांना अनेक ठिकाणी त्यांची कला सादर करण्याची संधी मिळेल व आपल्यातील गुणवत्ता सिद्ध करता येईल व आपोआपच अर्थार्जन पण होऊ शकेल हा या कार्यक्रम घेण्यामागील उद्देश होता.

यावेळेस दृष्टीबधित दत्तू यांच्या कानाडा राजा पंढरीचा, तुज सगुण म्हणून की निर्गुण या अभंगांना भरभरून दाद दिली. याच कार्यक्रमात कु. गौतमी वाघ हिने अभंग सादर केल्याने लायन्स क्लब च्या काही सदस्यांनी तिला बक्षीस म्हणून रोख रक्कम दिली. यावेळी मंचावर लायन्स क्लब चे अध्यक्ष श्री. उदय कोठवदे, लायन विनय बिरारी व संस्थेच्या मानद अध्यक्षा सौ. कल्पना पांडे उपस्थित होत्या.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता संस्थेच्या कोषाध्यक्षा सौ. विजया मराठे, सहसचिव सौ. मेघा पिंपळे, संचालक भगवान पवार यांनी विशेष परिश्रम घेतले.

4. **<u>अंध व्यक्तींच्या पाल्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप:</u>** दि ब्लाइंड वेल्फेअर ऑर्गनायझेशन व लायन्स क्लब नाशिक स्टार यांच्या संयुक्त विद्यमाने संस्थेचे कार्यालय शालिमार येथे ठीक 11:00 वाजता मान्यवरांच्या हस्ते 65 व्यक्तींना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. ज्यामध्ये वह्या, रजिस्टर, चित्रकला वही, कंपास, पाणी बॉटल आदींचा समावेश होता.

   यावेळेस लायन्स क्लब च्या वतीने क्लबच्या अध्यक्षा सौ. अश्विनी बाग, अभय बाग, अध्यापक साहेबराव कांगुणे हे उपस्थित होते. यावेळी श्री बाग यांनी आपल्या मनोगतातून त्यांनी एका विद्यार्थ्यांना शिकत राहावे असे प्रेरणा दायी विचार व्यक्त केले. तर अध्यक्षा लायन अश्विनी बाग यांनी देखील आपण हा कार्यक्रम बघून भारावून गेलो व भविष्यात या संस्थेला भरीव मदत करू अशी ग्वाही दिली. श्री कांगोणे यांनी देखील संस्थेचे कार्य मला मागील 15 वर्षापासून माहीत असून ज्या ज्या वेळेस संस्थेला माझी गरज वाटेल त्यावेळेस त्यांनी मला आवश्यक आवाज द्यावा अवश्य अडचण सांगावी, मला जे शक्य असेल ती मदत मी करेल अशी ग्वाही दिली.






कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता अध्यक्ष अरुण भारस्कर, कोषाध्यक्ष विजया डबे मराठे, संचालक भगवान पवार व रेचल शिरसाठ यांनी विशेष परिश्रम घेतले.

5. **<u>गुणवंत दृष्टिहीन विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा</u>**: प्रथमतः 2022- 23 या शैक्षणिक वर्षात दहावी, बारावी व पदवी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता. खरे तर विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप मिळावी या उद्देशाने विद्यार्थ्यांना सोयीचे होईल अशा पद्धतीचे 12 ऑगस्ट 2023 या दिवशी नाशिक येथे गुंज फाऊंडेशन च्या सहकार्याने नाशिक, जळगाव, धुळे, अ.नगर तर 2 सप्टेंबर 2023 रोजी रोटरी क्लब ऑफ हिरानंदाणी यांच्या पुढाकाराने ठाणे येथील जय भगवान हॉलमध्ये मुंबई, नवी मुंबई, ठाणे व कोकण विभागातील विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

तर 9 सप्टेंबर 2023 रोजी रोटरी क्लब ऑफ निगडी, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे येथील पत्रकार भवन येथे पुणे, सांगली, सातारा, सोलापूर या विभागातील विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. या तिन्ही कार्यक्रमात संस्थेच्या वतीने अंदाजे 180 विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणाकरिता प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला व 2024 या शैक्षणिक वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज वितरित करण्यात आले.



दि ब्लाइंड वेल्फेअर ऑर्गनायझेशन आणि रोटरी क्लब हिरानंदानी इस्टेट यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दिनांक 2 सप्टेंबर 2023 रोजी ठाण्याच्या जय भगवान हॉलमध्ये 2023 या शैक्षणिक वर्षात उत्तीर्ण झालेल्या इयत्ता दहावी, बारावी, बीए, एमए अशा 107 गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी मंचावर अभिनेता अशोक कुलकर्णी, रोटरी क्लबचे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर मिलिंद कुलकर्णी, उद्योजक नांजीभाई ठक्कर व रोटरी क्लब हिरानंदानी चे अध्यक्ष श्री सुकुमारन नायर व त्यांचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. या मान्यवरांच्या हस्ते सत्कारार्थींना रोख रक्कम व ज्ञानवर्धक इंग्रजी व्याकरणाचे ब्रेल लिपीतील पुस्तक भेट म्हणून देण्यात आले. आरंभी कॉलेजच्या विद्यार्थिनींनी स्वागत

गीत सादर केले व त्यानंतर हा उपक्रम का घेतला या मागची पार्श्वभूमी ब्लाइंड वेल्फेअरचे अध्यक्ष अरुण भारस्कर यांनी मान्यवरांना दिली.

यावेळेस त्यांनी संस्थेच्या उपक्रमांची देखील माहिती मान्यवरांना दिली आणि हा घटक शाबासकी मिळण्यापासून वंचित राहतो म्हणून हा कार्यक्रम आम्ही ठाणे येथे आयोजित केला आहे असे त्यांनी आपल्या मनोगत आतून व्यक्त केले. रोटरी क्लब चे डिस्टिक गव्हर्नर मिलिंद कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना अगदी सहजतेने प्रश्न उत्तरांद्वारे संवाद साधला व विद्यार्थ्यांचे कौतुक केले तर रोटरी क्लबचे अध्यक्ष श्री कुमारन नायर यांनी भविष्यात देखील संस्थेच्या सर्व उपक्रमांना आपण सर्वतोपरी मदत करू व दुर्लक्षित घटकांकरता रोटरी क्लब सदैव काम करत आहे व यापुढे काम करेल असे आश्वासन दिले. अशोक कुलकर्णी यांनी देखील विद्यार्थ्यांना यशाने भारावून न जाता पुढे शिकत राहावं अशी अपेक्षा व्यक्त केली व श्री स्वामी समर्थ या सिनेमातले काही डायलॉग विद्यार्थ्यांसमोर सादर केले.

सप्टेंबर महिन्यातच शिक्षक दिन असल्याने पुणे शहरातील सौ. स्वाती अवचार, सौ. उज्वला नारायण सोनी, श्री. नामदेव वसंतराव गरुड, श्री. दामोदर सरगम, सौ. राखी रामदास गायकवाड या अंध शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पुणे येथील कार्यक्रमात रोटरी क्लबचे अध्यक्ष श्री. हरविंदर सिंग दुल्लत यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले व आपण स्वतःला कोण स्वतःला कमी न समजता आपल्यात देखील क्षमता आहे हे सिद्ध करायला हवे कारण भाटिया नावाचे एक अंध उद्योजक आहे त्याने मेणबत्ती पासून आपला उद्योग सुरू केला व त्यानंतर ते आज 100 कोटींची उलाढाल वर्षाला करतात हे सांगितले. त्यामुळे भाटिया सारख्या अंध व्यक्तीचा आदर्श आपण घेतला तर आपण देखील खूप उच्च पदावर पोहोचू शकाल अशी अपेक्षा व्यक्त केली. त्यामुळे आपण अंध असताना न्यूनगंड न ठेवता आपण सकारात्मक दृष्टिकोन ठेवावा.



कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता महासचिव दत्ता पाटील, संचालक भगवान पवार, जैन सोशल परिवाराचे युवराज शहा, गुंज फाउंडेशनचे श्री. अमर कलंत्री यांनी विशेष विशेष परिश्रम घेतले.

6. **<u>गणेश उत्सवानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन:</u>** आपणास ज्ञात आहे व्यक्ती एकत्र आल्याने विचारांची आदान प्रदान होते. म्हणून लोकमान्य टिळकांनी गणेश उत्सवाची सुरुवात केली. म्हणूनच संस्थेच्या वतीने देखील गणपती उत्सवानिमित्त नाशिक मधील स्थानिक विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबविण्यात आले. ज्यामध्ये ऋषिपंचमी चे औचित्य साधून गजानन महाराज सेवा संस्थान च्या वतीने ब्रेल लिपीत गजानन स्तोत्र प्रकाशित करण्यात आले व गीत गायन व प्रश्नमंजुषा स्पर्धांचे देखील आयोजन करण्यात आले होते. यामध्ये जान्हवी त्रिभुवन प्रथम, हर्षदा पिंगळे द्वितीय तर उषा मौळे तृतीय असे क्रमांक देण्यात आले.




तर आपण नित्यनियमाने घरी गणपती आरत्या म्हणतो परंतु अनेकदा त्याचे उच्चार आपणास माहीत नसल्याने चुकीचे उच्चार होतात म्हणून आपले उच्चार स्पष्ट येण्याकरिता संस्थेच्या वतीने ब्रेल आरती संग्रहाचे प्रकाशन 27 सप्टेंबर 2023 रोजी श्रीमंत दगडूशेठ हलवाई महागणपती मंदिर, पुणे येथे करण्यात आले व आरती संग्रहाच्या प्रति महाराष्ट्रातील सर्व अंधशाळांना निशुल्क वितरीत करण्यात आल्या. निश्चितच हे पुस्तक दृष्टीहीन विद्यार्थ्यांना ज्ञानवर्धक ठरेल असे आम्हाला वाटते.

सदर पुस्तकाची वृत्तवाहिन्यांनी दखल घेऊन प्रसिद्धीही दिली. सदर पुस्तक प्रकाशनास सिद्धीविनायक ग्रुप व रोटरी क्लब ऑफ ठाणे स्कायलाइन यांचे विशेष सहकार्य मिळाले तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता संचालक भगवान पवार, मानद अध्यक्षा कल्पना पांडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

7. **<u>जागतिक पांढरी काठी दिनानिमित विविध स्पर्धांचे आयोजन:</u>** 15 ओक्टोंबर हा दिवस UNO ने घोषित केल्यानुसार संबंध जगभर पांढरी काठी दिवस म्हणून साजरा करण्यात येतो यानिमित्ताने दृष्टिहीन व्यक्तिं बाबत समाज जागृती व्हावी म्हणून या दिवशी अनेक संस्था समाज जागृतीच्या उद्देशाने विविध कार्यक्रमांचे आयोजन करतात. मग त्याला आपली द ब्लाइंड वेल्फेअर ऑर्गनायझेशन कशी अपवाद असणार म्हणूनच संस्थेच्या वतीने 15 ओक्टोंबर 2023 रोजी लायन्स क्लब हॉल पंडित कॉलनी नाशिक येथे रोटरी क्लब ग्रेप सिटी आणि लायन्स क्लब सुप्रीम यांच्या संयुक्त विद्यमाने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास व्यासपीठावर रोटरी क्लब ग्रेप सिटी चे अध्यक्ष जयंत खैरणार त्यांचे पदाधिकारी व लायन्स क्लब सुप्रीमोचे समन्वयक श्री शाम केदार, जे. पी जाधव व मानद अध्यक्ष कल्पना पांडे यावेळी मंचावर उपस्थित होते.

यावेळी संस्थेच्या उपक्रमांची माहिती देताना संस्थेचे अध्यक्ष अरुण भारस्कर यांनी मंचावर उपस्थित असलेल्या मान्यवरांना संबोधित करताना सांगितले की आम्ही अंध असलो तरी आमच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन हा सकारात्मक ठेवा, अंधत्व ही आमची समस्याच नाही तर समाजाने आम्हाला समजून घ्यावे हीच आमची खरी मोठी अडचण आहे. जर अंध व्यक्ती विविध पदांवर काम करतोय किंवा अनेक उल्लेखनीय क्षेत्रात त्यांनी अलौकिक नाव कमावले आहे म्हणून आम्ही कुठलेही काम करू शकत नाही असे समाजाला का वाटते.



कार्यक्रमात उपस्थित असलेल्यांना सागर बोडके या अंध युवकाचे उदाहरण दिले तो बँकेत नोकरी करत असताना देखील साऊथ आफ्रिकेत जाऊन त्याने माऊंट किलीमांजारो हा शिखर सर केला. तर याच कार्यक्रमात श्री मनोहर गाडेकर, फयाज शेख, जनार्दन इंगळे, चंद्रकांत साळवे, दादा पानपाटील व महेंद्र मुसळे या दृष्टीहीन व्यक्तींना स्वयंरोजगाराकरता मदतीचे धनादेश वितरित करण्यात आले. तर गीत गायन स्पर्धेत कांतीलाल क्षीरसागर याने पहिला क्रमांक मिळविला तर विकास चव्हाण हा दुसऱ्या क्रमांकाचा मानकरी ठरला फयाज शेख याला तृतीय क्रमांकावर समाधानी राहावे लागले व याच कार्यक्रमात 128 दृष्टीहीन व्यक्तींना पांढऱ्या काठीचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता महासचिव दत्ता पाटील, कोषाध्यक्ष विजया डबे मराठे, संचालक राजू व्यास, कु. रेचल शिरसाठ यांनी विशेष परिश्रम घेतले.

8. **<u>ब्रेल संस्कार भारती त्रैमासिक दिवाळी अंक प्रकाशन</u>**- अंध व्यक्तींच्या ज्ञानात भर पडावी व त्यांना साहित्याचे एक नवीन दालन निर्माण व्हावे या उद्देशाने संस्थेच्या वतीने मागील वर्षापासून ब्रेल संस्कार भारती हे त्रैमासिक सुरू करण्यात आले असून 2023 चा दिवाळी अंक माजी मुख्यमंत्री व शिवसेनाप्रमुख मा. उद्धव ठाकरे यांच्या शुभ हस्ते मातोश्री या निवासस्थानी 09 नोव्हेंबर 2023 रोजी प्रकाशन करण्यात आले. यावेळी खासदार संजय राऊत, संस्थेचे संचालक अर्जुन मुद्दा हे उपस्थित होते. यावेळी सदरचा दिवाळी अंक दृष्टिहीन बांधवांकरीता ज्ञानाचे नवे दालन उपलब्ध होईल अशी अपेक्षा मा. उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केली तर पुस्तक या अंकाकरीता शांतिकूमार फिरोदिया ट्रस्ट व रोटरी क्लब ऑफ बॉम्बे क्वीन सिटी यांचे विशेष सहकार्य मिळाले.





**<u>9. दिवाळी फराळ वाटप:</u>** हिंदू परंपरेनुसार दिवाळी सन मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात येतो कारण दिवाळी हा सण सणांचा राजा म्हणून ओळखला जातो. कारण दिवाळीच्या प्रत्येक दिवसाचे महत्व आहे आणि म्हणून हा सण इतरांप्रमानेच देखील दृष्टिहीन बांधवांनी गोड करावा अशी संस्थेची धारणा आहे. म्हणूनच गेल्या काही वर्षांपासून गरजू अंधानकरिता दिवाळी निमित्त संस्थेच्या वतीने उपक्रम राबविण्यात येतात.

याही वर्षी धनत्रयोदशीचे औचित्य साधून शनिवार दिनांक 11 नोव्हेंबर 2023 रोजी आर. पी विद्यालय पंचवटी येथे दि ब्लाइंड वेल्फेअर ऑर्गनायझेशन आणि लायन्स क्लब कॉर्पोरेट यांच्या संयुक्त विद्यमाने दृष्टिहीन बांधवांना दिवाळीनिमित्त साधारण 20 ते 25 दिवस पुरेल एवढे रेशन किट एक किलो मिठाई व सर्वांना नवीन कपडे देण्यात आले तर सौ रुक्मिणी बडसर व दत्तू कोराळे या दोन दृष्टिहीन व्यक्तींना कायमस्वरूपी पुनर्वसन व्हावे म्हणून सहा × सहा च्या दोन टपऱ्या देण्यात आल्या.

यावेळी मंचावर पीडब्ल्यूडी विभागाचे चीप इंजिनियर प्रशांत औटी, लायन्स क्लबचे अध्यक्ष उदय कोठावदे आदि मान्यवर उपस्थित होते. आरंभी अंधकलावंतांनी मराठी गीते सादर केले. मान्यवरांचे स्वागत संस्थेच्या मानध अध्यक्षा कल्पना ताई पांडे यांनी केले तर संस्थेच्या उपक्रमांची माहिती अध्यक्ष अरुण भारस्कर यांनी दिली व आभार प्रदर्शन महासचिव दत्ता पाटील यांनी केले. तसेच कार्यक्रमात ब्रेल संस्कार भारती या ऑडिओ दिवाळी अंकाचे एबीपी माझाचे संपादक श्री राजीव खांडेकर यांच्या हस्ते देखील प्रकाशन करण्यात आले.





कार्यक्रमाकरीता सम्राट ग्रुप, परम अनुभूति फॉऊंडेशन, संस्थेचे संचालक श्री अर्जुन मुद्दा यांचे विशेष योगदान मिळाले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता संस्थेच्या संचालिका सौ. प्रतिभा होळकर, संचालक दिनेश मुसळे यांचे विशेष सहकार्य लाभले.

**<u>10. राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेचे आयोजन:</u>** अंध व्यक्तींमध्ये देखील एक खेळाडू वृत्ती असते ती जोपासवी व त्यांच्या खेळाडू वृत्तीला वाव मिळावा या उद्देशाने संस्थेच्या वतीने दिनांक 25 व 26 डिसेंबर 2023 रोजी ठाणे येथील रेमंड मैदानावर राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

ज्यामध्ये संबंध महाराष्ट्रातून विभागानुसार आठ संघ सहभागी झाले होते. ज्यामध्ये मुंबई, पुणे, सोलापूर, नाशिक, विदर्भ, मराठवाडा, अकोला व ठाणे हे संघ सहभागी झाले होते. सदर स्पर्धा बाद फेरीने खेळविण्यात आली. या स्पर्धेत अंतिम सामना पुणे व अकोला संघात झाला ज्यात पुणे संघाने अकोला संघावर मात करून विजेतेपद पटकावले. यावेळी विजेत्या संघास रोख रक्कम 11500 व ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. तर अकोला संघास रोख रक्कम 7500 रु. व ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. मालिकाविराचा किताब प्रवीण करलुके याने मिळविला. यावेळी प्रमुख अतिथि म्हणून पुण्यातील ज्येष्ठ उद्योजक नाणजीभाई ठक्कर, सिंघानिया शाळेचे प्रशासक मनीष नार्वेकर व आदि मान्यवर उपस्थित होते.

यावेळी प्रस्ताविकात रोटरी क्लब च्या मार्गदर्शिका व ब्लाइंड वेलफेअरच्या संचालिका सौ. नेहा निंबाळकर यांनी अंध खेळाडूंच्या खेळाडूवृत्तीला प्रोत्साहन मिळण्याच्या उद्देशाने रोटरी क्लब नेहमीच पुढे राहील. तर अध्यक्ष अरुण भारस्कर यांनी देखील या स्पर्धांचा दर्जा उंचविण्याकरीता MCA व BCCI यांनी देखील पुढाकार घ्यावा अशी अपेक्षा व्यक्त केली.

यावेळी श्री नांजीभाई ठक्कर यांनी खेळाडूंचे कौतुक केले. आपण अंध असताना ही उत्तम खेळ केला याचे समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता अध्यक्ष माधवी डोळे, ब्लाइंड वेलफेअर ओर्ग. चे अध्यक्ष अरुण भारस्कर, संचालक दिनेश मुसळे यांनी विशेष परिश्रम घेतले.






**<u>11. मुंबई येथे राष्ट्रीय क्रिकेट (सियाराम चषक) स्पर्धांचे आयोजन:</u>** द ब्लाइंड वेल्फेअर ऑर्गनायझेशन या संस्थेच्या वतीने सलग बाराव्या वर्षी दिव्यांग खेळाडूंच्या राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धांचे आयोजन 10 जानेवारी 2024 ते 12 जानेवारी 2024 या कालावधीत करण्यात आले. ब्रेबोर्न स्टेडिअम वर मान्यवरांच्या उपस्थितीत सियाराम ब्लाइंड क्रिकेट कप चा उद्घाटन सोहळा संपन्न झाला. अंध व्यक्तींचा उत्साह वाढविण्याकरिता या स्पर्धेचे उद्घाटन अभिनेता निलेश कुलकर्णी व मुंबईचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या हस्ते करण्यात आले या स्पर्धेचे सर्व सामने लीग बेसिसवर खेळवण्यात आले होते.

आरंभी बँड च्या तालावर सर्व खेळाडूंनी पाहुण्यांना मानवंदना दिली त्यानंतर या स्पर्धेचे चेंडू मारून औपचारिक रित्या विधिवतपणे उद्घाटन करण्यात आले. या स्पर्धा घेण्यामागचा उद्देश काय आहे याबाबत संस्थेचे अध्यक्ष अरुण भारस्कर यांनी प्रास्ताविकातून सांगितले. अंधांच्या क्रिकेटला प्रोत्साहन मिळावे किंवा त्यांची खेळाडू वृत्ती जोपासवी या उद्देशाने या स्पर्धा संस्थेच्या वतीने दरवर्षी आयोजित करण्यात येतात कारण डोळस व्यक्तींना क्रिकेट खेळण्याकरिता अनेक स्पर्धा होतात. परंतु अंधांकरिता त्या खूपच दुर्मिळ असतात. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, राजस्थान, गुजरात, पंजाब, दिल्ली हे आठ संघ सहभागी झाले असून या स्पर्धा लिग बेसिसवर होणार असल्याची माहिती संस्थेचे डायरेक्टर अर्जुन मुद्दा यांनी दिली तर रमेश जी पोतदार यांनी देखील या स्पर्धांना भविष्यात देखील आपण एका विशिष्ट उंचीवर नेऊ असे ग्वाही दिली.

श्री मंगलप्रभात लोढा यांनी देखील खेळाडूंना सुभेच्छा देताना मार्गदशन केले की खेळाडू वृत्तीने खेळावे अशा दिल्या व संस्थेद्वारा हा उपक्रम अत्यंत प्रशंसणीय आहे असे मत व्यक्त केले व शैक्षणिक अथवा वैद्यकीय कामाकरिता आपण फाउंडेशन च्या वतीने आर्थिक मदत करू असे जाहीर केले. तर याच प्रसंगी संस्थेमार्फत 2024 सालच्या ब्रेल लिपीतील दिनदर्शीकेचे प्रकाशन एबीपी माझा वृत्तवाहिनीचे संपादक श्री राजीव खांडेकर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी त्यांनी खेळाडूंनी चमकदार प्रदर्शन करावे व जेणेकरून या स्पर्धेतून आपली खेळी बघून राष्ट्रीय स्तरावर आपली निवड व्हावी अशी अपेक्षा व्यक्त केली व त्यांनी संस्थेच्या उपक्रमांना शुभेच्छा दिल्या. तर निलेश कुलकर्णी यांनी देखील सिनेमातील डायलॉग सादर करून खेळाडूंचा उत्साह वाढवला. याप्रसंगी सीसीआय क्लब च्या सौ. मधुमती लेले, सिंघानिया शाळेच्या मुख्याध्यापिक रेवती श्रीनिवासन व रोटरी क्लब बॉम्बे क्वीन सिटीच्या अध्यक्षा अनुपमा जालन व त्यांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.






अंतिम सामना 12 जानेवारी 2024 रोजी मुंबईच्या इस्लाम जिमखाना मैदानावर खेळविण्यात आला. या सामन्यात महाराष्ट्र व गुजरात या संघात लढत झाली. महाराष्ट्राने उत्तम फलंदाजी करून आठ बाद 73 धावांचे माफक लक्ष गुजरात संघा समोर ठेवले. मात्र गुजरातने अवघ्या दोन गड्यांच्या मोबदल्यात हा सामना जिंकला व सलग तेरावे वर्षी गुजरात संघाने स्पर्धेत आपला दबदबा कायम ठेवला. यावेळी कार्यक्रमास सीमा सिंग, सामाजिक कार्यकर्ते विपिन आनंद, इस्लाम जिमखाण्याचे अध्यक्ष युसुफ अब्राणी, ओएनजीसी चे श्री. सचिन पटेल उपस्थित होते. यावेळी श्रीमती सिमा सिंग यांनी संस्थेच्या कार्याची प्रशंसा केली व संस्थेच्या अन्य उपक्रमांकरीता आणि शिष्यवृत्ती योजनेसाठी आर्थिक मदत देऊ केली.

तसेच पवन पोद्दार यांनी आपल्या मनोगत सांगितले की गुजरात हा संघ नेहमी जिंकतो, कुठेतरी आपण खेळात कमी पडतो त्याकरता सरावाची खूप आवश्यकता आहे म्हणून महाराष्ट्रातल्या संघाने सराव करणे खूप आवश्यक आहे. त्याकरिता सियाराम ग्रुप आपल्या नेहमी सोबत राहील. इस्लाम जिमखान्याचे अध्यक्ष युसुफ अब्राणी यांनी देखील दोन्ही संघाच्या खेळाडूंचे कौतुक केले व यापुढे देखील इस्लाम जिमखानाचे मैदान आम्ही उपलब्ध करून देऊ अशी ग्वाही दिली मात्र जे संघ हरले त्यांनी निराश न होता सराव करावा व पुढील वर्षी आपण विजेते पदापर्यंत कसे पोहोचू याचा विचार करावा.

या अंतिम सामन्याचे थेट प्रक्षेपण दूरदर्शन चैनल च्या डीडी स्पोर्ट्स वर दाखविण्यात आल्याने स्पर्धेचा दर्जा तर उंचवलाच शिवाय दिव्यांग व्यक्ती क्रिकेट खेळू शकतात हे समाजापर्यंत पोहोचवण्याची जनजागृती ही झाली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता अध्यक्ष अरुण भारस्कर, संचालक अर्जुन मुद्दा, हनीफ शेख यांनी विशेष परिश्रम घेतले.

**<u>12. सहलीचे आयोजन:</u>** अंध व्यक्तींना ऊर्जा प्राप्त व्हावी या उद्देशाने सहलीचे आयोजन: दि ब्लाइंड वेल्फेअर ऑर्गनायझेशन या संस्थेच्या वतीने अंध व्यक्तींना ताण-तणावातून मुक्ती मिळावी या उद्देशाने दरवर्षी सहलीचे आयोजन करण्यात येते. कारण सध्याचे जीवन म्हटलं की अतिशय गतिमान आणि धकाधकीचे जीवन झाले आहे. यात कोणी नोकरी करतो, कोणी व्यवसाय करतो त्यात त्यांना प्रचंड प्रमाणात ताण-तणाव निर्माण होतात आणि हे ताण-तणाव कमी व्हावे जेणेकरून काम करण्याकरिता एक नवीन ऊर्जा प्राप्त व्हावी हा या मागचा उद्देश असतो म्हणून संस्थेच्या वतीने मागील 14 वर्षापासून अखंडितपणे सहलीचे आयोजन करण्यात येते. यानिमित्ताने विविध धार्मिक स्थळे व काही प्रेक्षणीय स्थळांचा समावेश असतो.

अंध व्यक्ती हा अंध असल्यामुळे अनेकदा त्याला घरची मंडळी विचारतात की तू तीर्थक्षेत्र स्थळी जाऊन तिथे काय बघणार? तुला काय दिसणार? त्यामुळे त्याच्यात एक न्युनगंड तयार होतो आणि पर्यायाने त्याच्यात काम करण्याची क्षमता ही कमी होते. म्हणून हाच तान तणाव कमी करावा या उद्देशाने संस्थेच्या वतीने यावर्षी दिनांक 24 ते 29 जानेवारी 2024 या कालावधीत सहलीचे आयोजन करण्यात आले होते.

 

या सहलीचे प्रस्थान कैलास मठातून झाले तेथून ही सहल अक्कलकोट व अक्कलकोट हून पंढरपूर वरून नरसोबाची वाडी व कोल्हापूर नंतर गोव्याला पणजी येथे क्रुझ वर बसुन त्यांनी आनंद घेतला व डीजेच्या तालावर त्यांनी ठेका धरला. हा आनंद त्यांच्या करता अविस्मरणीय होता. एकंदरीतच अतिशय अल्पदारात अंध व्यक्तींना संस्थेच्या माध्यमातून या सहलीचा आनंद घेता आला. या सहलीच्या निमित्ताने टीनं फिरण्याचा, देवदर्शनाचा आनंद त्र् मिळालाच शिवाय एका वेगळ्याच विश्वात जाता आले.

13. **<u>हळदी कुंकू कार्यक्रमाचे आयोजन</u>**: आपल्या हिंदू संस्कृतीत रथसप्तमी पर्यंत महिलांकरिता हळदीकुंकवाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. खरे तर डोळस महिलांना विविध संस्था व मंडळांमार्फत अशा कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी मिळते. मात्र दृष्टिहीन महिलांना देखील एक व्यासपीठ मिळावे व त्यांच्या विचारांची देवाण-घेवाण करता यावी या उद्देशाने फेब्रुवारी 2024 रोजी संस्थेच्या कार्यालयात स्थानिक महिलांकरिता हळदीकुंकवाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते त्याकरिता त्यांना भेटवस्तू देण्यात आली.

कार्यक्रमाच्या यशस्वी ते करिता संस्थेच्या कोषाध्यक्ष विजया मराठे दबे मानद अध्यक्षा कल्पना पांडे व सहसचिव मेघा पिंपळे यांनी विशेष परिश्रम घेतले.




14. **<u>जागतिक महिला दिनाचे आयोजन:</u>** 8 मार्च हा सबंध जगभर जागतिक महिला दिन म्हणून साजरा करण्यात येतो मात्र परीक्षा कालावधी असल्याकारणाने अंध भगिनींनी सहभाग नोंदवावा याकरिता संस्थेच्या वतीने रविवार दिनांक 17 मार्च 2024 रोजी नाशिक येथे रूमठा हायस्कूल येथे महिला दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्ताने अंध महिलांच्या गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते तर रुक्मिणी बडसर, सविता गोसावी या महिलांना व्यवसायाकरिता आर्थिक मदत करण्यात आली तर गायन स्पर्धेत गौतमी वाघ हिने प्रथम पारितोषिक मिळवले. चंद्रभागा मौळे हिने द्वितीय क्रमांक मिळवला. तर तृतीय क्रमांक आरती मोरे हिला मिळाला उपस्थित सर्व अंध महिला भगिनींना भेटवस्तू देण्यात आल्या.





अशाच पद्धतीच्या कार्यक्रमाचे आयोजन दिनांक 23 मार्च 2024 रोजी ठाणे येथील जय भगवान हॉल येथील येथे करण्यात आले होते त्या कार्यक्रमात मुंबई व ठाणे परिसरातील अंध महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या याच कार्यक्रमात उल्लेखनीय काम करणाऱ्या सहा महिलांचा सत्कार करण्यात आला

ज्याचा आदर्श इतरांनी घ्यावा हा त्यामागे संस्थेचा उद्देश होता तर याच कार्यक्रमात व्यवसाय करणाऱ्या दहा अंध महिल्यांना व्यवसायाकरिता धनादेश देण्यात आले.





कार्यक्रमाच्या यशस्वी ते करिता संस्थेच्या कोषाध्यक्ष विजया मराठे दबे, मानद अध्यक्षा कल्पना पांडे व सहसचिव मेघा पिंपळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

मित्रांनो दरवर्षी मी संस्थेसाठी काही ना काही वेगळी उपलब्ध घेऊन येण्याचा प्रयत्न करत असतो आणि त्या उपलब्धी आपल्यासमोर वाटून घेताना खूप समाधानीही असतो कारण त्यामध्ये स्वप्नपूर्तीचा सुगंध असतो, आनंद असतो, दरवर्षी जोडणारे नवीन दाते, संस्था, क्लब, उद्योजक व राजकीय या सर्वांच्या माध्यमातून मी माझी नवीन उपलब्धी आपल्यासमोर व्यक्त करतो. त्यामागे माझी मेहनत असतेच परंतु देणगीदारांचा महत्त्वाचा वाटा असतो त्यामुळे अशा सगळ्याचा नामनिर्देश व त्यांच्यासाठी ऋणनिर्देश करणे खूप महत्त्वाचे आहे. ज्यामध्ये अहमदनगरचे नरेंद्र फिरोदिया, प्रशांत औटी, केशव वरखेडकर, कृष्णकुमार गोयल, दलुचंद भाई जैन, सियाराम ग्रुप, भारत पेट्रोलियम, विविध कॉर्पोरेट बँका तसेच रोटरी क्लब, लायन्स क्लब अशा काही व्यक्ती संस्थेचा आधारस्तंभ आहे की ज्यांचे योगदान अगदी संस्थेच्या सुरुवातीपासूनच आम्हाला मिळाले आहे.

तसेच प्रसार माध्यमांनी संस्थेच्या कार्याची दखल घेतल्याने संस्था अनेकांपर्यंत पोहोचू शकली या अहवालात कोणाचा उल्लेख करायचा राहिला असेल अशा ज्ञात अज्ञातांचे पुनश्च एकदा आभार. याशिवाय मला सहकार्य करणारे संस्थेचे पदाधिकारी या सर्वांची साथ आहे म्हणूनच मी समर्थपणे इथपर्यंत वाटचाल करू शकलो त्यामुळे सर्व पदाधिकाऱ्यांचे देखील मनःपूर्वक आभार.

मानतो आभार मनापासून
साथ शुभेच्छांची अशीच राहू द्या !
या ऋणानुबंधांनी जुळलेल्या मनात
आपुलकीचे भाव कायम असू द्या!
धन्यवाद ..!

महासचिव
दत्तात्रय शंकर पाटील
द ब्लाइंड वेलफेअर ओर्गनाईजेशन इं, नाशिक

THE BLIND WELFARE ORGANISATION (INDIA)
P.T.R. F 9205
Reg. No. 298/2006,
Nashik Society
Reg. Act. 1860